**रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी**

**Rambhau Mhalgi Prabodhini**

# जनसहभागातून सुशासन विषयावरील राष्ट्रीय परिषद अंतर्गत

## चित्रकला स्पर्धा

### दि. २५ जानेवारी, २०१७

### स्पर्धेचा अहवाल



विजेत्या विद्यार्थीनीला सन्मानित करतांना श्री. अरविंद रेगे, श्रीमती. गीता जैन, श्रीमती. नाझ रिझवी

दि. २५ जानेवारी, २०१७ रोजी जनसहभागातून सुशासन या राष्ट्रीय परिषदे अंतर्गत **'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी'** आणि **'नॅशनल म्युझिअम ऑफ नॅचरल हिस्टोरी'** यांच्या संयुक्त विद्यमानाने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेमध्ये मिरा-भाईंदर व मुंबई परिसरातील **१८ शाळा** आणि **८ महाविद्यालयातील इयत्ता ८वी ते १२ वी** मधील एकूण **१४० विद्यार्थी व विद्यार्थीनींनी** सहभाग घेतला होता.



स्पर्धेचा आनंद घेऊन चित्र रंगविताना विद्यार्थी



विविध शाळांमधून सहभागी झालेले विद्यार्थी स्पर्धेचा आनंद घेत चित्र रंगविताना

या स्पर्धेचे अभिषेक आचार्य, स्नेहा वऱ्हाडी आणि सेज शेट्टी यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

या स्पर्धेच्या पारितोषिक समारंभ कार्यक्रमासाठी मिरा भाईंदरच्या महापौर **श्रीमती. गीता जैन**, प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य **मा. श्री अरविंद रेगे** आणि नॅशनल म्युझिअम ऑफ नॅचरल हिस्टोरी या संस्थेच्या संचालक **श्रीमती. नाझ रिझवी** यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले आणि विजेत्या विद्यार्थांना प्रमाणपत्र वितरित केले.



स्पर्धेचे परिक्षण करताना परिक्षक: अभिषेक आचार्य, स्नेहा वराडी आणि सेज शेट्टी




प्रथम, द्वितीय आणि तृतीय विजेत्या विद्यार्थांचे चित्र

तीन विद्यार्थांना विजेते तसेच पाच विद्यार्थांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थांनी प्रत्येकी पाच अशी फळ व फुलांच्या झाडांची बियाणे देण्यात आली व त्यांनी आपल्या शाळेत व अन्य ठिकाणी रुजवावित व वाढवावित हा संदेश देण्यात आला

********